# मेट्रो तीनचा पहिला टप्पा पूर्णत्वाकडे

## आरे ते बीकेसी मार्गाचे ८८ टक्के काम झाल्याची प्रशासनाची माहिती

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ८ : मुंबईतील बहुप्रतीक्षित भूमिगत मेट्रो तीनच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगाने सुरू आहे. आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर अखेरपर्यंत मुंबईकरांसाठी खुला केला जाणार आहे. या टप्प्याचे ८८.२ टक्के काम पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रोने दिली आहे; तर बीकेसी ते कफ परेड या मार्गाचे ७७.३ टक्के काम पूर्ण झाले आहे. ही संपूर्ण भूमिगत मेट्रोसेवा जून २०२४ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा मुंबई मेट्रोचा मानस आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिलेल्या माहितीनुसार ३१ मेपर्यंत मेट्रो तीनचा पहिला टप्पा असलेल्या आरे ते बीकेसी मार्गाचे काम हे काम ८८.२ टक्के पूर्ण झाले. यातील ओव्हरहेडचे काम ५८.८० टक्के, सर्व यंत्रणांचे काम ६६.७ टक्के, स्टेशनची उभारणी ९३.४ टक्के, भुयारीतील स्टेशनची उर्वरित कामे ९७.८ टक्के, मेट्रो मार्ग बसवणे ८९.५ टक्के पूर्ण झाले आहे; तर दुसऱ्या टप्प्यातील बीकेसी ते कफ परेड मार्गिकेचे ७७.३ टक्के काम पूर्ण झाले आहे. ओव्हरहेडचे काम ४६.३० टक्के, सर्व यंत्रणांचे काम ४६.८० टक्के, स्टेशनची उभारणी ८८.७ टक्के, भुयारीतील स्टेशनची उर्वरित कामे ८८.७० टक्के, तर मुख्य मार्गातील कामे ४६.९० टक्के झाली आहेत.



### प्रगतीचा आढावा (टक्केवारी)

| स्थानक | स्थापत्य | तांत्रिक कामे |
|---|---|---|
| आरे | ३२.५ | १८ |
| मरोळ नाका | ९८.२ | ८६.७ |
| विमानतळ | ९३ | ६९.१ |
| सांताक्रूझ | ८९.८ | ५९.२ |
| बीकेसी | ९२.३ | ६०.७ |
| विद्यानगरी | ९२.८ | ६६.८ |
| विमानतळ टी१ | ९०.८ | ६७.१ |
| सहार रोड | ९०.८ | ६७.१ |
| एमआयडीसी | ९८.२ | ८६.७ |
| सिप्झ | ९७.७% | ८५.८ |



**८८.२ टक्के**

पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण



## नागरिकांच्या सेवेसाठी मान्सून कंट्रोल रूम सुरू

मुंबई, ता. ८ : पावसाळ्यात प्रवाशांचा प्रवास विनाव्यत्यय करण्याच्या दृष्टीने महामुंबई मेट्रोने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून चारकोप मेट्रो डेपोमध्ये २४ तास कार्यरत असणारी मान्सून कंट्रोल रूम स्थापित करण्यात आली आहे.

प्रवाशांना तत्काळ मदत मिळवून देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशी कंट्रोल रूम कार्यरत राहणार असून प्रशिक्षित कर्मचारी २४ तास इथे कार्यरत असतील. जे हवामानामुळे उद्भवणारी अनपेक्षित परिस्थिती तसेच प्रवासादरम्यानचा व्यत्यय तत्काळ सोडवण्यास मदत करतील. आपत्कालीन परिस्थितीत कंट्रोल रूमसोबत संपर्क साधण्यासाठी १८०० ८८९ ०५०५ / १८०० ८८९ ०८०८ हे टोल-फ्री क्रमांकाची सुविधा पुवण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ समन्वय साधण्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन, महापालिका आपत्ती व्यवस्थापन केंद्र, पोलिस नियंत्रण कक्ष, रुग्णवाहिका सेवा आणि अग्निशमन दलासोबत मुंबई मेट्रोच्या मान्सून कंट्रोल रूमचा हॉटलाईन क्रमांक थेट जोडलेला आहे. ज्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत उपरोक्त संस्थांसोबत तत्काळ समन्वय साधून समस्येचे तत्काळ निराकरण करता येईल. १० स्थानकांवर वाऱ्याची गती व दिशा यांची नोंद करणारे ॲनिमोमीटर यंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

महामुंबई मेट्रो नागरिकांना विनाव्यत्यय तसेच सुरक्षित प्रवास सुविधा पुरवण्यासाठी कटिबद्ध आहे. मान्सून कंट्रोल रूम ही आधुनिक तंत्रज्ञानाने प्रशिक्षित कर्मचारी यांनी सज्ज आहे. इतर वाहतूक व्यवस्थेमध्ये व्यत्यय आल्यास महामुंबई मेट्रोकडून गरजेनुसार अतिरिक्त मेट्रो सेवा चालवण्याची तयारी करण्यात आली आहे.

**- डॉ. संजय मुखर्जी**, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक